# कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठीची जाहिरात

**जाहीरात क्र. ०१/२०१८ दिनांक : १८ / ०६ /२०१८**

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक जस्वप्र -0214/प्रक्र 34/पापू 11 दि. 17.2.2014 अन्वये जलस्वराज्य २ कार्यक्रमासाठी पद निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यानुसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा अंतर्गत सातारा जिल्ह्यासाठी "डाटा एन्ट्री ऑपरेटर व क्षेत्र सहाय्यक (खलाशी)" ही पदे ११ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर, कंत्राटी पध्दतीने भरणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. पद भरतीचे स्थान, पदांची संख्या खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| पद संकेतांक | पदाचे नांव | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १ | १.एच.एस.सी (12वी)उत्तीर्ण, मराठी टंकलेखन- 30 प्रतिमिनीट, इंग्रजी टंकलेखन-40 प्रतिमिनीट<br>२.सदर पदासाठी कामाचा किमान 1 वर्षाचा अनुभव | १२०००/- (रक्कम रुपये बारा हजार फक्त |
| २ | क्षेत्र सहाय्यक (खलाशी) | १ | १.एस.एस.सी (10 वी) उत्तीर्ण,<br>2.शारिरीक दृष्ट्या योग्य असावा | ८०००/- (रक्कम रुपये आठ हजार फक्त |

उपरोक्त पदांसाठी अर्जाचा नमूना, शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय आर्थिक मोबदला व कामाचे स्वरुप, अटी व शर्ती निवड प्रक्रिया इत्यादीबाबतचा सविस्तर तपशील www.zpsatara.gov.in तसेच http://gsda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

इच्छुक उमेदवारांनी जाहिरातींचा व सुचनांचा बारकाईने अभ्यास करुन आपला अर्ज सर्व कागदपत्रांच्या पुर्ततेसह **दिनांक- ०३/०७/२०१८ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** सदस्य् सचिव तथा **वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा** यांचेकडे पोस्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावेत. विहीत वेळेनंतर /तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. उमेदवाराने अर्ज सादर करताना नेमणुकीसाठीच्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

**स्वाक्षरीत/-**
**सदस्य सचिव तथा**
**वरिष्ठ भुवैज्ञानिक,**
**भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,**
**सातारा**

**स्वाक्षरीत/-**
**अध्यक्ष निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

## जलस्वराज्य टप्पा क्र. 2 अंतर्गत कंत्राटी "डाटा एन्ट्री ऑपरेटर व क्षेत्र सहाय्यक (खलाशी)" पदे जिल्हास्तरावरील नेमणुकीसाठी अटी व शर्ती

1. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीला बोलविणेचा हक्क अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे गृहीत धरु नये.

2. प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारणेत आलेले नाहीत, अशा उमेदवारांना मुलाखतीसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

3. कंत्राटी " डाटा एन्ट्री ऑपरेटर व क्षेत्र सहाय्यक (खलाशी)" या पदाच्या भरती प्रक्रियेसाठी शैक्षणिक अर्हता व निकष प्राप्त उमेदवारांना बोलावून निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

4. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन वैध ठरलेल्या अर्जदारांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत, वेळ, दिनांक, निवडलेल्या उमेदवारांची यादी, निवड प्रक्रियेच्या सर्व सुचना www.zpsatara.gov.in तसेच http://gsda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. उमेदवारांना कोणत्याही सूचना थेट पत्रव्यवहार किंवा ई-मेल वा अन्य माध्यमातून दिल्या जाणार नाहीत. केवळ मुलाखतीसाठी पत्रव्यवहार केला जाईल.

5. डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदासाठी शैक्षणिक अर्हता ही एच.एस.सी (12वी)उत्तीर्ण असावी तसेच मराठी टंकलेखन- 30 प्रतिमिनीट, इंग्रजी टंकलेखन-40 प्रतिमिनीट असावे. एक वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

6. डाटा एन्ट्री ऑपरेटर हे पद भरताना कौशल्य चाचणी आणि मुलाखती घेण्यात येतील. कौशल्य चाचणी आणि मुलाखती मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

7. क्षेत्र सहाय्यक (खलाशी) या पदासाठी शैक्षणिक अर्हता ही एस.एस.सी (10 वी) उत्तीर्ण, तसेच शारिरीक दृष्ट्या योग्य असावा.

8. क्षेत्र सहाय्यक (खलाशी) हे पद भरताना मुलाखती घेण्यात येतील. मुलाखती मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

9. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नवी मुंबई यांनी दि. 14 ऑक्टोबर, 2014 अन्वये दिलेले सुचनान्वये प्राप्त झालेल्या अर्जामधून, अनुभवाची अट पूर्ण करीत असलेले उमेदवार उपलब्ध् न झाल्यास व शैक्षणिकदृष्टया पात्र उमेदवार अन्यथा पात्र ठरलेस अनुभवाची अट विचारात न घेता (शिथील करुन) उमेदवारांची निवड करण्यात येईल. अर्जासोबत अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

10. जिल्हास्तरावरील डाटा एन्ट्री ऑपरेटर व क्षेत्र सहाय्यक (खलाशी) पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, अर्थिक मोबदला, कामाचे स्वरुप, मानधन इत्यादी बाबींसाठी शासन निर्णय क्र. जस्वप्र-0114/प्रक्र 05/पापू 11 दि. 06.02.2014 व जस्वप्र-0214/प्रक्र34/पापू 11 दि. 17.02.2014 चे शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अवलोकन करावे.

11. सदरचे पद वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा जिल्हा कार्यालयासाठी तात्पुरते पद म्हणून कार्यक्रम कालावधीतपुरते कार्यरत राहील. कार्यक्रम कालावधी संपल्यानंतर सदरचे पद व्यपगत होईल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या नेमणुका करार संपल्यानंतर संपुष्टात येतील. कंत्राटी तत्वावर नेमलेल्या कर्मचा-यांना कंत्राटी सेवेच्याआधारे शासनाच्या नियमित सेवेत सामावून घेतले जाणार नाही.

12. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वय मर्यादा 50 वर्षे राहील व किमान 18 वर्षे असेल तसेच सेवानिवृत्त सरकारी/निमसरकारी अधिकारी/कर्मचा-यांची कंत्राटी पदावर नियुक्ती करताना वयाची कमाल मर्यादा 65 वर्षे राहील. यास्तव सदर पदासाठी सेवानिवृत्त कर्मचारी फॉर्म भरु शकतात. वयाच्या पुराव्यासाठी अर्जासोबत 10 वी प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला साक्षांकित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

13. उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवासखर्च किंवा इतर कोणताही भत्ता शासनाकडून दिला जाणार नाही.

14. उमेदवारांना मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

15. उमेदवाराला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

16. शैक्षणिक अर्हतेच्या तसेच मराठी/इंग्रजी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असलेचे मार्कलिस्ट / प्रमाणपत्राच्या साक्षांकित फोटोप्रती अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

17. निवड प्रक्रियेसंबंधीची सर्व माहिती **www.zpsatara.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. या प्रक्रियेमध्ये वेळोवेळी दिल्या जाणा-या सूचनांचे पालन करण्याची तसेच निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

18. अर्जासोबत शैक्षणित अर्हता प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या आधारे तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील पदासाठी अर्ज करताना जात प्रमाणपत्र अथवा जातीचे वैधता प्रमाणपत्र साक्षाकिंत फोटोप्रती जोडणे बंधनकारक आहे. तसेच मुळ अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

19. प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, क्षेत्रविषयक ज्ञान, अनुभव व इतर मुळ कागदपत्रे तसेच त्यांच्या साक्षांकित प्रतींसह विहीत तारीख व वेळेत उपस्थित राहावे. उमेदवार विहीत तारखेस व वेळेवर उपस्थित न राहिल्यास शासन अथवा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा जबाबदार राहणार नाही.

20. कंत्राटी पध्दतीने पद भरताना उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले जाईल व त्यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमानुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल व पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करणेत येईल.

21. उमेदवाराचा अर्ज हा ए 4 आकाराच्या कागदावर 16 फाँटमध्ये टंकलिखीत अथवा हस्तलिखीत केलेला असावा व अर्जासोबत अर्जामध्ये नमूद केलेली आवश्य्क ती सर्व कागदपत्रांच्या सांक्षांकित फोटो प्रती जोडाव्यात. परिपूर्ण व नमून्यातील अर्जच ग्राहय धरण्यात येतील.

22. अर्जासाठी व प्रवेशपत्रासाठी स्वतंत्र लखोटे वापरण्यात यावेत.

23. मूळ फॉर्मसोबत प्रवेशपत्रासाठी रु.5/- चा टपाल तिकीट लावलेला कोरा लिफाफा जोडावा व सदर लिफाफयावर प्रेषक या ठिकाणी स्वत:चे नांव व पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह सुवाच्छ अक्षरात लिहावा. तसेच सदर को-या लिफाफयामध्ये प्रवेशपत्र ठेवताना त्यामध्ये आवश्यक ती माहिती (उदा. नांव, उमेदवाराची स्वाक्षरी व पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून) प्रवेशपत्र लिफाफयामध्ये ठेवण्यात यावे व तो अर्जासोबत अथवा अर्जाच्या लखोटयात देण्यात यावे.

24. मूळ अर्जासाठी वापरण्यात येणा-या लखोटयावर उमेदवाराने ठळक अक्षरात " डाटा एन्ट्री ऑपरेटर अथवा क्षेत्र सहाय्यक (खलाशी)" या पदासाठी अर्ज असा स्पष्ट उल्लेख करावा.

25. डाटा एन्ट्री ऑपरेटर व क्षेत्र सहाय्यक (खलाशी) हे पद वरिष्ठ भूवेज्ञानिक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा अंतर्गत सातारा जिल्हयासाठी कार्यरत राहील.

26. अर्ज संबंधित ठिकाणी **दि. 03/07/2018 रोजी सायं. 5.30 वाजेपर्यंत** सदस्य सचिव तथा वरिष्ठ भूवेज्ञानिक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा यांचे कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत व्यक्तिशः अथवा पोस्टाद्वारे सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. पोस्टाद्वारे अर्ज सादर करताना होणा-या विलंबास संबंधित विभाग जबाबदार राहणार नाही. पोस्टातर्फे अथवा प्रत्यक्ष विहीत मूदतीच्या वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

27. अंतरिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत नमूद केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती, कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारावर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

28. कागदपत्र छाननी अंती पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेशपत्र पोस्टाने त्यांच्या पत्रव्यवहाराच्या पत्यावर पाठविण्यात येतील. तरीसुध्दा त्यांना ते मुलाखत दिनांकापूर्वी न मिळालेस दोन दिवस अगोदर ती सदस्य सचिव तथा वरिष्ठ भूवेज्ञानिक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा यांचे कार्यालयात समक्ष देण्यात येतील.

29. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

30. जाहिरातीमधील काही बाबी विषयी शंका असल्यास त्यांनी सदस्य सचिव, तथा वरिष्ठ भूवेज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा यांना कार्यालयीन दिवशी व वेळेत समक्ष भेटावे.

31. ही सर्व पदे जलस्वराज्य टप्पा क्र.2 या कार्यक्रमासाठी असून सदर पद भरती प्रक्रियेत बदल करणे, अंशत: बदल करणे, स्थगित करणे, रद्द करणे, पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, मुलाखत न घेणे अथवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**सदस्य सचिव तथा**
**वरिष्ठ भुवैज्ञानिक,**
**भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,**
**सातारा**

**स्वाक्षरीत/-**
**अध्यक्ष निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

परिशिष्ट -१

वरिष्ट भू-वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालयामध्ये तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये पदभरतीबाबत गुण दर्शविणारा तक्ता

| अ.क्र | पदाचे नांव | गट चर्चा (Group Discussion) | मुलाखतीसाठीचे गुण | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक अर्हता | तांत्रिक ज्ञान | क्षेत्र विषयक ज्ञान | क्षेत्रामधील अनुभव | व्यक्तीमत्व | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० = ३ +९ |
| | निम्न व्यावसायी (डेटा एन्ट्री ऑपरेटर) | ४० (कौशल्य चाचणीसाठी गुणांकन) गट चर्चा लागु नाही. | ०५ | ---- | ---- | --- | ०५ | १० | ५० |
| | खलाशी | ----- | ------ | ---- | ----- | ----- | १० | १० | १० |

**प्रपत्र अ**

**(अर्जाचा नमुना)**

| |
|---|
| स्वतः साक्षांकित केलेला आयडेंडी साईज फोटो |

प्रति,

मा.सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती सातारा
तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा.

**भरती पदाचे नांव :- ------------------------------------**

**१)** अर्जदाराचे संपूर्ण नांव (नांव प्रथम) (मराठी):- ---------------------------------------------------

(नांव प्रथम) (इंग्रजी):- ---------------------------------------------------

**२)** उमेदवाराचे नावात बदल असलेस (नांव प्रथम) (मराठी) :- ----------------------------------------

(नांव प्रथम) (इंग्रजी):- ---------------------------------------------------

(सोबत कागदोपत्री पुरावा आवश्यक)

**३)** अर्जदार स्त्री आहे की पुरुष, **स्त्री / पुरुष** **विवाहित / अविवाहित**

(लागू नसेल ते खोडावे)

**४)** पत्रव्यवहाराचा पत्ता :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

४अ) दूरध्वनी / मोबाईल क्रमांक :- दू.क्र. ---------------------- / मोबाईल ------------------

**५)** जात :- ----------------------------- पोटजात :- --------------------------------------

५अ) जातीचा प्रवर्ग - (योग्य ठिकाणी √ अशी खूण करावी.)

| अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड. | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

**६)** अर्जदाराची जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) तारीख -------- महिना -------- वर्ष --------

**७)** अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दिनांक :- ०३ / ०७ /२०१८ रोजीचे असणारे वय वर्ष ------------ महिना ----------- दिवस -----------

**८)** अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल)

| शैक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**९)** पुर्वानुभव असल्यास :-

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**१०)** टंकलेखनाची अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल)

| भाषा | शब्द प्रतिमिनिट | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मराठी | | | | |
| इंग्रजी | | | | |

मी. श्री./श्रीमती.-----------------------------------------------------------------
प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस पात्र व बांधील राहीन.

स्थळ :-

दिनांक :- / /२०१८ **अर्जदाराची स्वाक्षरी**

(अर्जदाराचे नांव ---------------------------------)

**प्रपत्र ब**

महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना - अ

**प्रतिज्ञापत्र (नियम ४ पहा)**

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------------ श्री.---------------------------------------------------------- यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय ------- वर्ष राहणार ---------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते/करतो की,

१) मी ----------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ तद्‌नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**ठिकाण -**

**दिनांक -** **अर्जदाराची सही**

**अर्जदारांचे संपुर्ण नांव.-----------------------**

# प्रपत्र क

वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,सातारा
यांचे कंत्राटी पदासाठी भरती प्रक्रिया २०१८

**कौशल्य चाचणी परिक्षेचे प्रवेश पत्र**

| उमेदवारांचे बैठक क्रमांक | परिक्षेचा दिनांक व वेळ<br>दि. / /२०१८ वेळ - |
|---|---|
| | |
| उमेदवारांचे नांव व संपुर्ण पत्ता | |
| लिंग - | पदनाम - |
| परिक्षा केंद्राचे नांव | |
| परिक्षा केंद्राचे पत्ता | |

या ठिकाणी उमेदवारांनी अलीकडील काळातील आयडेंटी साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांचेकडून साक्षांकीत करावा.

उमेदवाराची स्वाक्षरी

मा.सदस्य सचिव निवड समिती
तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सातारा

**सूचना :-**

१. सदर परिक्षेस दिलेला प्रवेश, उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व त्या पदासाठी विहीत केलेल्या प्राथमिक तपासणीच्या अधीन राहुन तात्पुरता दिलेला आहे. परिक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवाराची पात्रता, मुळ प्रमाणपत्रे अंतीम निकालापुर्वी किंवा त्यानंतर कधीही तपासण्यात येईल. त्यावेळी एखादा उमेदवार अपात्र असल्याचे आढळुन आल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२. उमेदवारांनी या प्रवेशावर, तसेच परिक्षेच्या वेळी देण्यात येणा-या सुचनांचे अत्यंत काळजीपुर्वक पालन करावे. सुचनाचे पालन न करणारा उमेदवार परिक्षा कक्षाबाहेर घालवुन देणे, त्यास संबधीत परिक्षा अथवा निवडीस प्रतिरोधीत (DEBAR) करणे, अपात्र ठरविणे, उमेदवारी रद्द करणे यापैकी एक किंवा अधिक शिक्षा देण्यास पात्र ठरेल.

३. उमेदवारांनी परिक्षा कक्षात पेपरसाठी वेळेआधी अर्धा तास अगोदर येणे आवश्यक आहे. हा कालावधी उमेदवारांची हजेरी तपासणे, उत्तरपत्रिका देणे व सुचना देणे यासाठी राहील.

४. परिक्षा वेळेतच येणा-या उमेदवारांनाच परिक्षा कक्षेत प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थीतीत परिक्षा कक्षेत परिक्षा साठी प्रवेश देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

५. परिक्षा कक्षात प्रवेश मिळण्यासाठी सदर प्रवेश प्रमाणपत्र तसेच फोटो असलेल्या इतर ओळखपत्रापैकी एक ओळखपत्र परिक्षाच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

६. प्रवेशपत्रावरील छायाचित्रास विशेष कार्यकारी अधिकारी किंवा राजपत्रित अधिका-यांची स्वाक्षरी व शिक्का याप्रकारे घ्यावे कि अर्धी स्वाक्षरी व शिक्का व फोटोवर आणि अर्धी खाली कागदावर येईल. ही पुर्तता नसल्यास परिक्षेस बसता येणार नाही. तसेच लिफाफयावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

७. परिक्षेच्या वेळी हजेरीपटावर उमेदवाराने केलेली स्वाक्षरी, परिक्षेच्या आवेदनपत्रावर केलेल्या स्वाक्षरीशी व उत्तरपत्रिकेवरील स्वाक्षरीशी जुळणारी असावी. अन्यथा त्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.

८. परिक्षे बाबत सर्वच हक्क निवड समितीकडे राहतील.

------------------------------------------------------------------------------------------------------------

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा

**<u>पोहोच पावती</u>**

यांचे कंत्राटी पदासाठी भरती प्रक्रिया २०१८

उमेदवाराचे नाव - ---------------- ----------------- -------------------

उमेदवाराचे बैठक क्रमांक - दिनांक - / /२०१८ वेळ -

पदाचे नाव - -------------------------

**परिक्षा केंद्राचे नाव -** **समवेक्षकाची स्वाक्षरी**